# जाहिर नोटीस

## कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई.

**(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)**

**अर्जदारांची ऑफलाईन अर्ज भरणे व स्विकृतीचे वेळापत्रक**

**१) अर्जदारांसाठी ऑफलाईन अर्ज भरण्याचा दिनांक : दि ०१/ ०८ /२०२१ पासून ते दि. ३१ /०८ /२०२१ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत**

**२) स्वहस्ते ( Manually ) सोडतीचा दिनांक : दि. / /२०२१.**

**३) अर्ज स्विकारणेचे स्थळ : मिळकत व्यवस्थापक-१/कोंकण मंडळ, कक्ष क्र.१७२, पोटमाळा, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे [पू] मुंबई-५१**

मौजे, चितळसर मानपाडा [ टिकूजीनी वाडी जवळ ] जि. ठाणे येथील कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची निवासी योजना जाहिर केली होती. त्याअनुषंगाने अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट करीता संकेत क्र.१३८ व १३९ अन्वये विहित मुदतीमध्ये ( ०३/७/२००० ते ०२/८/२००० ) अनामत रक्कम घेऊन अर्ज मागणी आजमाविण्यात आली होती. तसेच मौजे टिकूजीनी वाडी [ चितळसर मानपाडा ] जि.ठाणे येथील निवासी योजनेमधील अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गटातील सदनिकांची २०/०१/२००४ ते २६/२/२००४ या कालावधीमध्ये संकेत क्र.१३८ अ, व १३९ अ च्या अनुषंगाने अर्ज मागणी आजमाविण्यात आली होती.

तथापि १३८,१३९, व १३८ अ, १३९ अ वरील प्रस्तावित योजना काही तांत्रिक कारणामुळे पूर्ण होऊ शकलेली नाही. तद्नंतर या योजनेच्या जागेवर स्विस चॅलेंज पध्दतीनूसार सदयस्थितीत योजना प्रगतीपथावर आहे.

संकेत क्र १३८,१३९, व १३८ अ, १३९ अ च्या अनुषंगाने त्या कालावधीमध्ये अर्ज केलेल्या ब-याच अर्जदारांनी आजपावेतो त्यावेळी अर्जासोबत भरलेली अनामत रककम परत करणेत आलेली नाही किंवा घेतलेली नाही अशा अर्जदारांच्या मागणीच्या अनुषंगाने त्या जागेवर सदयस्थितीमध्ये प्रगतीपथावर असलेल्या इमारतीमध्ये सदनिका देण्याबाबतच्या प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली होती. या मान्यतेप्रमाणे अशा अर्जदारांना सन २०१४ मध्ये तशी पत्रे देखील कोंकण मंडळाने दिलेली होती.

चितळसर मानापाडा टिकुजीनी वाडी, जि. ठाणे येथील संकेत क्र १३८,१३९, व १३८ अ, १३९ अ च्या अनुषंगाने ज्या अर्जदारांनी यापूर्वी अर्ज दाखल केले आहेत व आजपावेतो अनामत रक्कम या कार्यालयाकडून परत घेतलेली नाही केवळ अशा अर्जदारांनाच या जाहिरातीनुसार अर्ज करता येतील. त्या व्यतिरिक्त अर्ज आल्यास सदरचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

संकेत क्र १३८,१३९, व १३८ अ, १३९ अ च्या अनुषंगाने अर्ज केलेल्या व आजपावेतो अनामत रक्कम परत न घेतलेल्या अर्जदारांनी या जाहिरातीचे अनुषंगाने विहित मुदतीत अर्ज न केल्यास त्यांचा कोणताही दावा / हरकत राहणार नाही व अशा अर्जदारांची अनामत रक्कम विहीत मुदतीनंतर म्हणजे दि.३१/०८/२०२१नंतर बिनव्याजी परत करण्यात येईल.

वरील सर्व बाबी विचारात घेता ज्या अर्जदारांनी संकेत क्र. १३८,१३९, व १३८ अ, १३९ अ च्या अनुषंगाने त्या त्या वेळी अर्ज दाखल केले असून आजपावेतो अनामत रक्कम या कार्यालयातुन परत घेतलेली नाही. फक्त अशाच अर्जदारांसाठी चितळसर मानपाडा [ टिकूजीनी वाडी जवळ ] येथील स्वीस चॅलेंज योजनेतील अल्प उत्पन्न गटाच्या सदनिकासाठी स्वहस्ते अर्ज मागविण्यात येत आहे. तसेच सदरची जाहिरात ऑफलाईन असल्याने अर्जदारांनी प्रत्यक्ष कार्यालयात येऊन स्वहस्ते अर्ज सादर करावे. याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनेचा संकेत क्र. | योजनेचे नाव | उत्पन्न गट | सदनिकेची अंदाजित किंमत | सदनिकेचे चटई क्षेत्रफळ अंदाजित (चौ.मी.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३८ ब | चितळसर मानपाडा | अल्प उत्पन्न गट | रु.३१,४७,९८८/- | ३१.७७ चौ.मी. | |
| २ | १३९ ब | चितळसर मानपाडा | अल्प उत्पन्न गट | रु.३१,४७,९८८/- | ३१.७७ चौ.मी. | |

**नोंदणीसाठी व अर्ज भरण्यासाठी आवश्यक बाबी.**

- **पॅन कार्ड, आधार कार्ड, बँकेचा रद्द केलेला चेक अथवा पासबूक चे पहिले पान, पासपोर्ट साईज फोटो.**
- **अर्जदारांने सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे.**

१. अर्जदाराने आपले वय अर्ज सादर केल्याच्या दिनांका रोजी १८ वर्षापेक्षा जास्त होते हे सिध्द करणारे कागदपत्रे.

२. अर्जदार किंवा त्याची पत्नी/पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावावर मालकी तत्वावर, भाडे खरेदी पध्दतीवर अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून अर्जदार ज्या महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत / ग्रामपंचायत [ स्थानिक प्राधिकरण ] हद्दीतील गृहनिर्माण योजनेमध्ये अर्ज करणार आहे. त्या महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत / ग्रामपंचायत हद्दीत म्हाडाने वितरीत केलेला किंवा खाजगीरित्या संपादित केलेला निवासी गाळा नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.

३. जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून महाराष्ट्रातील मागील सलग २० वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अर्जदाराचे किमान १५ वर्षाचे वास्तव्य असणे आवश्यक आहे. त्यासाठी अधिवास प्रमाणपत्र रहिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४. अर्जदार ( पती व पत्नी ) यांचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न अल्प उत्पन्न गटासाठी रु.२५,००१/- ते ५०,०००/- पर्यंत असलेले वेतन प्रमाण / उत्पन्नाचा दाखला.

५. अर्जासोबत पूर्वी दाखल केलेल्या अर्जाचा पुरावा किंवा अनामत (EMD) रक्कमेची पावती जोडणे आवश्यक राहील.

६. ज्या अर्जदारांनी राखीव गटामध्ये अर्ज केलेले आहेत अशा अर्जदारांची पात्रता सिध्द होणेककरीता जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, ईत्यादी सादर करणे आवश्यक राहील.

**पात्रता निकष -** सर्वसाधारण सूचना व क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond ) ( शासनाचे दि.०९/३/२०१५ च्या परिपत्रकानुसार )

१. अर्जदार पात्र ठरल्यास अशा लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, सेवा शुल्क व जी.एस.टी. इत्यादी अदा करावा लागेल.

२. म्हाडाने / कोंकण मंडळाने कोणत्याही प्रकारच्या प्रतिनिधी / सल्लादेणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून कोणाचीही नेमणूक केलेली नाही. या करीता अर्जदारांना सूचित करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनाला / भुलथापाला बळी पडू नये.

३. अन्य काही कारणास्तव योजनेत फेरबदल किंवा रद्द करण्याचा अधिकार कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने म्हाडाने राखून ठेवलेला आहे व त्याबद्दल अर्जदाराचा कुठलाही दावा / मागणी / हक्क स्विकारण्यांत येणार नाही.

४. जाहिरातीमध्ये अनावधानाने झालेल्या छपाईच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही.

५. सदर योजनेतील यशस्वी लाभार्थ्यांनी तेथे विकासकाकडून / सदनिकाधारकाकडून स्थापन होणा-या गृहनिर्माण संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील.

६. अनामत रक्कम परताव्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
योजनेमधील अर्जदाराने अर्ज माघार घेतल्यास अंदाजित किंमतीच्या १ टक्का रक्कम वजा करुन बाकी रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल.

७. सदर योजनेतील वितरणांस महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास [ मिळकत व्यवस्थापन, विक्री हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल ] विनियम १९८१ व [ जमिनींची विल्हेवाट ] नियम १९८१ तरतूदी जशाच्या तश्या [ वेळोवेळी होणा-या सुधारणांसह ] लागू राहतील.

**( टिप : अर्जाची किंमत रु.५०० + GST रु.६०/- एकूण रु.५६०/- विना परतावा.) सोबत माहिती पुस्तीका**

(डॉ. नितीन महाजन)
CHIEF OFFICER,
KONKAN HSG, & A.D. BOARD
MUMBAI